pnb Housing
Finance Limited

कॉर्पोरेट कार्यालय : ९ वा मजला, अंतरिक्ष भवन, २२, के. जी. मार्ग, नवी दिल्ली - ११० ००१.
दूरध्वनी : ०११-२३३५७१७१, २३३५७१७२, २३७०५४१४ वेबसाइट : www.pnbhousing.com
शाखेचा पत्ता : ५ वा मजला, श्रीरंग हाउस, जेएम रोड, पाषाणकर ऑटोच्या जवळ, शिवाजीनगर, पुणे - ४११ ००५.
दूरध्वनी : ०२० - २५५३४१६०, ई-मेल : pune@pnbhousing.com, वेबसाइट : www.pnbhousing.com

जाहीर सूचना - स्थावर मालमत्तांचा जाहीर लिलाव तथा विक्री

नियम ८ (६) च्या तरतुदी व परिशिष्ट ४ (ए) नुसार स्थावर मालमत्तेच्या विक्रीकरिता ई-लिलाव विक्री सूचना

(सिक्युरिटायझेशन अँण्ड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शियल असेट्स अँण्ड एन्फोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट अॅक्ट, २००२ अंतर्गत) तारीखवार सुधारित

सूचना याद्वारे देण्यात येत आहे की, पीएनबी हाउसिंग फायनान्स लि. (पीएनबीएचएफएल) ही कंपनी कायदा, १९५६ अंतर्गत नोंदणीकृत एक हाउसिंग फायनान्स कंपनी (एचएफसी) आहे, तसेच नॅशनल हाउसिंग बँक अॅक्ट, १९८७ च्या अनुच्छेद २९-ए अंतर्गत नॅशनल हाउसिंग बँकसुद्धा आहे व पंजाब नॅशनल बँकेची एक उपकंपनी आहे.

ज्याअर्थी, सिक्युरिटायझेशन अँण्ड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शियल अॅसेट्स अँण्ड एन्फोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट अॅक्ट, २००२ अंतर्गत व सिक्युरिटी इंटरेस्ट (एन्फोर्समेंट) रूल्स, २००२ अनुच्छेद १३ (१२) सहवाचन नियम ३ अंतर्गत अधोहस्ताक्षरित पीएनबी हाउसिंग फायनान्स लि. च्या प्राधिकृत अधिकाऱ्यांनी खालील निर्देशित खात्यासमोर विहित तारखेस मागणी सूचना जारी केली होती ज्यामध्ये संबंधित कर्जदारांना सदर सूचनांच्या तारखेपासून ६० दिवसांच्या आत प्रत्येक खात्यासमोर निर्देशित रकमेचे प्रदान करण्याचे निर्देश देण्यात आले होते. कर्जदारांनी सदर रकमेचे प्रदान करण्यात कसूर केली असल्याने सदर सूचना कर्जदारांना व आम जनतेस देण्यात येत आहे की, अधोहस्ताक्षरितांना सदर कायद्याचे अनुच्छेद १३ (४) सहवाचन सदर नियमाच्या नियम ८ व ९ अंतर्गत त्यांना प्राप्त अधिकारान्वये खालील खात्यासमोर निर्देशित तारखेस सदर मालमत्तेचा ताबा घेतला आहे.

खालील विवरणीत स्थावर मालमत्तेच्या जशी आहे जेथे आहे तत्त्वावर व जशी आहे जी आहे तत्त्वावर खरेदीकरिता मोहोरबंद लिफाफ्यातून वा जाहीर लिलावाद्वारे (ई-लिलावासमवेत) अधोहस्ताक्षरितांद्वारे प्रस्ताव मागविण्यात येत आहेत (बोली मोहोरबंद लिफाफ्यातून प्राधिकृत अधिकाऱ्यांकडे सादर करण्यात याव्यात). मालमत्ता ही पीएनबीएचएफएलकडील कर्जदारांच्या कर्ज खात्यांसंदर्भात प्रतिभूती म्हणून सादर करण्यात आली होती. खालील निर्देशित केल्यानुसार कर्ज खात्यांसंदर्भात थकीत देण्यांच्या वसुलीकरिता सदर मालमत्तेची विक्री करण्यात येत आहे :

अ. क्र.	कर्ज खाते क्र. (ए)	कर्जदार/सहकर्जदार, हमीदाराचे नाव (बी)	मागणी सूचना रक्कम व दिनांक (सी)	ताब्याचे स्वरूप (डी)	गहाण मालमत्तांचे विवरण (ई)	राखीव मूल्य आरपी (रु.) (एफ)	इरठे (राखीव मूल्याच्या १०%) (जी)	परीक्षणाची तारीख व वेळ (एच)	लिलाव दिनांक व वेळ (आय)	ज्ञात भार, काही असल्यास (जे)
१.	००१५ ६६६०००३२८८ बी.ओ.-पुणे	श्री. काटे अमित बबन, न्यू भागीरथ फार्मा कु. राजश्री अमित काटे.	रु. ३,७२,५४,०८१.३४ (रु. तीन कोटी बाहत्तर लाख चोपन्न हजार एक्याऐंशी व चौतीस पैसे मात्र) १६.१०.२०१७ रोजीनुसार	प्रत्यक्ष ताबा	फ्लॅट क्र. ११०१, एफ टॉवर नं. २६, लोढा बेलमोन्डो, देहू रोड, पुणे, महाराष्ट्र - ४१०१०५. (क्षेत्र ५२६२ चौ. फूट/५ बीएचके)	रु. २,५५,१५,०००/- (रु. दोन कोटी पंचावन्न लाख पंधरा हजार मात्र)	रु. २५,५१,५००/- (रु. पंचवीस लाख एकावन्न हजार पाचशे मात्र)	१५.०१.२०१९ रोजी दु. १२.०० वा.	२२.०१.२०१९ रोजी दु. १२.३० ते दु. २.३०	लागू नाही
२.	एचओयु/पीयूएन/०११६/३२०४२३ बी.ओ.-पुणे	श्री. कृष्णा नागनाथराव यामेकर स्वाती रवि नेहूलकर	रु. ३४,९१,०१०.७६ (रु. चौतीस लाख एक्याण्णव हजार दहा व शहात्तर पैसे मात्र) दि. १५.१०.२०१८ रोजीनुसार	प्रत्यक्ष ताबा	४०१, ४, सिगल बिल्डिंग, ३ ग्रीन, सर्व्हे क्र. ६५, हाडेवाडी रोड, सातव नगरजवळ, गाव मु. हडपसर, ता. हवेली, जि. पुणे - ४११ ०२८. (क्षेत्र ६९० चौ. फूट/१ बीएचके)	रु. २४,०५,७००/- (रु. चोवीस लाख पाच हजार सातशे मात्र)	रु. २,४०,५७०/- (रु. दोन लाख चाळीस हजार पाचशे सत्तर मात्र)	१५.०१.२०१९ रोजी दु. १२.०० वा.	२२.०१.२०१९ रोजी दु. १२.३० ते दु. २.३०	लागू नाही
३.	एनएचएल/पीयूएन/०६१५/२२६६५६ बी.ओ.-पुणे	श्री. महेश शरदचंद्र बेलवलकर, कु. मोहिनी महेश बेलवलकर, मे. एसबीपी फार्मा	रु. २,९२,८३,८२०.८१ (रु. दोन कोटी ब्याण्णव लाख त्र्याऐंशी हजार आठशे वीस व ऐक्याऐंशी पैसे मात्र) दि. १८.१०.२०१७ रोजीनुसार	प्रत्यक्ष ताबा	कार्यालय क्र. ५,६,७,८ अप्पर ग्राऊंड, सर्व्हे क्र. २८२, हिस्सा क्र. ३/२/१, विंग-बी, श्री साई लीला रेसिडेन्सी, पोरवाल रोड, लोहेगाव, पुणे-४११ ०३२. दुकान क्र. ५, ६, ७, ८, ग्राऊंड, अप्पर ग्राऊंड, सर्व्हे क्र. २८२, हिस्सा क्र. ३/२/१, विंग बी, श्री साई लीला रेसिडेन्सी, पोरवाल रोड, लोहेगाव, पुणे - ४११ ०३२. (क्षेत्र २८६० चौ. फूट/८ दुकाने)	रु. १,११,६४,८५४/- (रु. एक कोटी अकरा लाख चौसष्ट हजार आठशे चोपन्न मात्र)	रु. ११,१५,४८५/- (रु. अकरा लाख पंधरा हजार चारशे पंचाऐंशी मात्र)	१५.०१.२०१९ रोजी दु. १२.०० वा.	२२.०१.२०१९ रोजी दु. १२.३० ते दु. २.३०	लागू नाही

ज्याअर्थी, प्रतिभूत धनकोंचे (पीएनबीएचएफएल) प्राधिकृत अधिकाऱ्यांनी सदर मालमत्तेची वसुलीत लावण्याचा निर्णय घेतला असल्याने, सदर विक्री सूचना प्रसिद्ध करण्यात येत आहे की, वरील विवरणीत मालमत्तेची वरील विहित तारीख, वेळेवर व ठिकाणी विक्री करण्यात येत आहे. संबंधित कर्जदार/गहाणवटदारांना विशेषतः व आम जनतेस याद्वारे इशारा व प्रतिबंध करण्यात येत आहे की, त्यांनी सदर कायद्याच्या अनुच्छेद १३ (१३) अंतर्गत प्रतिभूत मालमत्तेसंदर्भात कोणताही व्यवहार करू नये व मालमत्तेसंदर्भातील कोणताही व्यवहार हा वरील विहित कर्ज खात्यासंबंधात प्रतिभूत धनकोंच्या प्रभारांच्या अधीन असेल. संबंधित कर्जदार/गहाणवटदारांना त्यांची संबंधित कर्जखात्यांशी संबंधित थकीत रकमेचे त्यावरील संपूर्ण व्याज व उद्भवलेले प्रभार यांचे लिलाव तारखेच्या एक कार्यदिवस अगोदरपर्यंत प्रदान करावे अन्यथा सदर मालमत्तांची वरील विहित वेळापत्रकानुसार विक्री करण्यात येईल. वरील रकाना क्र. डी मध्ये विहित वरील सर्व कर्जदार/सहकर्जदार व हमीदारांना, वरील रकाना डी मध्ये विहित तारखेस, वरील रकाना सी मध्ये विहित मागणी सूचनेनुसार एकूण थकबाकीचे त्यावरील लागू दरानुसार पुढील व्याज, तसेच वसुलीच्या तारखेपर्यंत उद्भवलेले/उद्भवणारे प्रासंगिक खर्च, मूल्य, प्रभार यांसमवेत प्रदान करण्याचे निर्देश देण्यात आले होते.

वरील विहित स्थावर प्रतिभूत मालमत्तेसंदर्भातील तपशील हा अधोहस्ताक्षरितांच्या सर्वोत्तम माहिती व ज्ञानानुसार आहे जे सदर तपशिलातील कोणतीही त्रुटी, चुकीचे विवरण वा मजकूर वगळला जाणे याकरिता जबाबदार नसतील. निविदाकार/प्रस्तावदार/प्रस्तावित बोलीदार/खरेदीदारांना विनंती करण्यात येत आहे की, त्यांनी त्यांच्या बोली सादर करण्यापूर्वी वरील विहित मालमत्तांसंबंधातील तसेच अन्य सर्व तपशिलासंदर्भात स्वतः हून पडताळणी करून घ्यावी.

जाहीर लिलावाच्या अटी व शर्ती :

१. विक्री ही खालील विहित अटी व शर्तींच्या अधीन तसेच इच्छुक बोलीदारांद्वारे सादर करावयाचे प्रस्ताव/निविदा दस्तावेजांमध्ये विहित अटी व शर्तींच्याही अधीन असेल.

२. मालमत्तेची विक्री ही भार, काही असल्यास त्यांसमवेत, जशी आहे जेथे आहे तसेच जशी आहे जी आहे तत्त्वावर करण्यात येईल. लिलाव करावयाच्या मालमत्तेचे परीक्षण वरील विहित तारीख व वेळेवर करता येईल. ई-लिलाव आयोजित करण्यासाठी केवळ मे. मॅजिक ब्रिक्स रियल्टी सर्व्हिसेस लिमिटेड हे आमचे सहयोगी भागीदार आहेत. यासंदर्भातील कोणतीही चौकशी वा स्पष्टीकरणासाठी किंवा निविदा/लिलाव अर्ज प्रस्तावांच्या सादरीकरणासंदर्भात आमचे मार्केटिंग एजंट मे. मॅजिकब्रिक्स रियल्टी सर्व्हिसेस लिमिटेड, नोंदणीकृत कार्यालय १०, दर्यागंज, नवी दिल्ली - ११० ००२ व मुख्य कार्यालय पत्ता टाइम्स सेंटर (डिजिटल कन्टेन्ट प्रॉडक्शन फॅसिलिटी), एफसी - ६ (तिसरा मजला), सेक्टर १६-ए, फिल्म सिटी, नोएडा - २०१ ३०१ (उ. प्र.) www.auctions.magicbricks.com येथे संपर्क साधावा. तथापि, मॅजिक ब्रिक्स कॉल सेंटर टीमकडून वापरकर्त्यांद्वारे उद्भवलेल्या कोणत्याही प्रश्नांना उत्तरे देता न आल्यास, मॅजिकब्रिक्स ते प्रश्न पीएनबी एचएफएल अधिकाऱ्यांशी संपर्क साधून त्यांच्याकडे पाठवील (संपर्क तपशील रकाना क्र. ४ मध्ये विहित आहे). एखादी तांत्रिकी अडचण वा त्रुटी आढळून आल्यास लिलाव शाखा स्तरावर तसेच पारंपरिक पद्धतीने पार पाडण्यात येईल.

३. प्रस्तावित बोलीदार/खरेदीदारांचा शोध वा मार्केटिंगसाठी मार्केटिंग एजन्सी/सेवा प्रदाते म्हणून आम्ही मे. इन्व्हेन्ट ऑन सोल्युशन्स प्रायव्हेट लिमिटेड (समीर सेनापती संपर्क क्रमांक : ८४२२८६१३६७) यांची तसेच स्थानिक मार्केटिंग एजन्सी सेवा प्रदात्यांची नेमणूक केली आहे जे लिलाव प्रक्रिया पूर्ण करण्यातही आम्हाला सहकार्य करतील.

४. निविदाकार/प्रस्तावदार/प्रस्तावित बोलीदार/खरेदीदारांनी त्यांचे प्रस्ताव कोणत्याही राष्ट्रीयीकृत बँकेद्वारे जारी पीएनबी हाऊसिंग फायनान्स लिमिटेडच्या नावे पुणे येथे देय धनाकर्ष वा पे ऑर्डर स्वरूपातील वरील रकाना क्र. जी मध्ये उल्लेखित इसारा रक्कम ठेवीसमवेत (इरठे) मोहोरबंद लिफाफ्यातून त्यावर मालमत्तेच्या खरेदीकरिता प्रस्ताव असे नमूद करून ते आमचे प्राधिकृत अधिकारी, श्री. इक्बाल आलम (मोबाइल क्र. ९९५८१९५४५३ व नीलेश अरुण वाडेकर (मोबाइल क्र. ७७५५९३६३१७), पीएनबी हाउसिंग फायनान्स लिमिटेड, ५ वा मजला, श्रीरंग हाउस, जेएम रोड, पाषाणकर ऑटो, शिवाजीनगर, पुणे - ४११ ००५ दूर. ०२०-२५५७६०११ यांच्याकडे बोली सादरीकरणाची अंतिम तारीख अर्थात दि. २१.०१.२०१९ रोजी सायं. ५.३० वाजता वा तत्पूर्वीपर्यंत सादर करावेत. यशस्वी बोलीदारांद्वारे प्रदान केलेली इरठेची रक्कम विक्री मूल्यासंदर्भात जुळवून घेण्यात येईल.

५. न भरलेले प्रस्ताव किंवा इरठेशिवाय असलेले प्रस्ताव किंवा वरील विहित तारीख व वेळेपश्चात प्राप्त झालेले प्रस्ताव हे विचारात घेतले जाणार नाहीत/अवैध प्रस्ताव समजण्यात येतील व त्यानुसार ते रद्द करण्यात येतील. इरठेवर कोणतेही व्याज देय नसेल.

६. प्रस्ताव दस्तावेजांसमवेत इच्छुक बोलीदारांनी आयकर विभागाद्वारे जारी पॅन कार्ड (किंवा फॉर्म ६०) तसेच त्यांच्या/तिच्या ओळखीचा पुरावा तसेच निवासाचा पुरावा जसे पासपोर्ट, निवडणूक आयोगाचे कार्ड, रेशन कार्ड, चालक परवाना आदी दस्तावेजांच्या प्रतीसुद्धा जोडाव्यात.

७. कोणत्याही परिस्थितीत राखीव मूल्याखाली (आरपी) मालमत्तेची विक्री केली जाणार नाही. बोली विस्तार रक्कम रु. ५०,०००/- हून कमी रकमेच्या पटीत नसावी, ही बाब स्पष्ट करण्यात येत आहे.

८. सर्वोच्च बोलीदार/प्रस्तावदारास मालमत्तेची विक्री केली जाईल, जी बाब प्रतिभूत धनको अर्थात पीएनबी हाउसिंग फायनान्स लिमिटेडद्वारे बोली स्वीकृतीच्या अधीन असेल. वरील विवरणीत रकाना आयमध्ये विहित तारीख व वेळेवर आमचे सेवा प्रदाते/मार्केटिंग एजन्सी मे. मॅजिकब्रिक्स रियल्टी सर्व्हिसेस लिमिटेड यांच्या वेबसाइटवर आंतरबोली आयोजित करण्यात येईल. तथापि, कोणतेही कारण न देता कोणताही प्रस्ताव/निविदा स्वीकारणे वा रद्द करण्याचा अधिकार अधोहस्ताक्षरितांकडे राखून आहे.

९. सदर मालमत्तेसंदर्भातील सर्व थकबाकीसमवेत सर्व थकबाकी व देणी अर्थात मनपा कर, मालमत्ता/सोसायटी प्रभार, विजेचे व पाण्याचे कर वा अन्य देणी हे यशस्वी बोलीदार/खरेदीदारास प्रदान करावे लागतील.

१०. यशस्वी बोलीदार/खरेदीदारास विक्रीच्या संदर्भात प्राधिकृत अधिकाऱ्यांद्वारे प्रस्ताव स्वीकृतीपश्चात खरेदी रकमेच्या २५% रक्कम (इरठे समाविष्ट) त्वरित जमा करावी लागेल, अन्यथा इरठे जप्त करण्यात येईल.

११. विक्री रकमेच्या उर्वरित ७५% रकमेचे प्रदान प्राधिकृत अधिकाऱ्यांद्वारे यशस्वी खरेदीदाराच्या नावे विक्री निश्चितीच्या तारखेपासून १५ दिवसांच्या आत किंवा सिक्युरिटी इंटरेस्ट (एन्फोर्समेंट) रूल्स, २००२ च्या नियम ९ नुसार प्रतिभूत धनकोंच्या संपूर्ण अखत्यारित व प्राधिकृत अधिकाऱ्यांद्वारे लिखित व संपूर्णतः मंजूर अशा विस्तारित कालावधीच्या आत करावे. विक्री रकमेच्या उर्वरित ७५% च्या किंवा त्याच्या कोणत्याही भागाच्या प्रदानात कसूर झाल्यास, जमा केलेली रक्कम जप्त करण्यात येईल व प्रतिभूत धनकोंना मालमत्तेची पुन्हा विक्री करण्याचे स्वातंत्र्य असेल व कसूरदार खरेदीदारांचे मालमत्तेसंदर्भातील सर्व दावे किंवा यापूर्वी जमा केलेल्या खरेदी रकमेपैकी कोणत्याही भागाबाबतचे दावे जप्त करण्यात येतील.

१२. अधोहस्ताक्षरित प्राधिकृत अधिकाऱ्यांद्वारे विक्री निश्चितीच्या तारखेपासून वरील विहित स्थावर मालमत्तेसंदर्भात सर्व बाबींसंदर्भात सर्व बाबी तसेच आग वा चोरी वा अन्य प्रसंगामुळे होणारी हानी वा नुकसान किंवा अन्य कोणत्याही जोखमीसंदर्भातील सर्व जोखीम व जबाबदारी ही यशस्वी खरेदीदारांची असेल. कोणत्याही पार्श्वभूमीवर विक्री वार्षिक करण्यास यशस्वी बोलीदार पात्र नसतील.

१३. मालमत्तेची अंतिम बोली रक्कम/विक्री मूल्य रु. ५०.०० लाख वा त्यावर असल्यास यशस्वी बोलीदारास करकपातकर्ता म्हणून कर्जदाराचा पॅन क्रमांक देऊन विक्री मूल्यातून बोली रकमेच्या १% दराने टीडीएस वजावट करून सादर करावी लागेल जी प्राधिकृत अधिकारी बँकेकडून बोलीच्या पूर्ततेपश्चात प्राप्त होऊ शकेल व उर्वरित विक्री रकमेच्या ९९% रक्कम बँकेस निर्धारित कालावधीत प्रदान करावी लागेल. त्यामुळे, सर्वोच्च यशस्वी बोलीदारास आयकर कायदा १९६१ च्या कलम १९४ - आयए नुसार कर्जदाराच्या पॅन वर निर्धारित मालमत्तेच्या खरेदीवर १% टीडीएस जमा करावा लागेल.

१४. लिलावांतर्गत मालमत्तेचे विक्री मूल्य रु. ५०.०० लाख वा त्याहून अधिक असल्यास यशस्वी बोलीदार-खरेदीदारास वर विहित केल्यानुसार संपूर्ण विक्री मूल्याच्या (निव्वळ टीडीएस) प्रदानावर व विक्री औपचारिकतेच्या पूर्ततेवर टीडीएस जमा केल्यासंदर्भात फॉर्म क्र. २६ क्यूबीमधून चलान तथा स्टेटेंटच्या प्राप्तीपश्चात सरफैसी कायदा व नियम २००२ अंतर्गत विहित प्रारूपानुसार संबंधित मालमत्तेकरिता विक्री प्रमाणपत्र देण्यात येईल. फॉर्म १६ बी मधून टीडीएसकरिताचे प्रमाणपत्र नंतर बँकेस सादर करावे.

१५. विक्री प्रमाणपत्र नोंदणीकृत करवून घेण्याची जबाबदारी ही यशस्वी बोलीदाराची असेल. वरील संदर्भात मालमत्तेकरिताचे स्टॅम्प ड्युटी, नोंदणीकरण प्रभार, हस्तांतरण प्रभार तसेच विक्री प्रमाणपत्राच्या नोंदणीकरणासंदर्भातील अन्य सर्व खर्च व प्रभार हे यशस्वी बोलीदार/खरेदीदारास प्रदान करावे लागतील. विक्री प्रमाणपत्र लवकरात लवकर नोंदणीकृत करवून घेणे आवश्यक असेल अन्यथा खरेदीदारांस नोंदणीकरणाच्या विलंबाचे कारण नमूद करणारे विनंतीपत्र प्रतिभूत धनकोंना द्यावे लागेल.

१६. प्राधिकृत अधिकारी हे सर्वोच्च वा कोणताही वा सर्व प्रस्ताव स्वीकारण्यास बांधील नसतील व पीएनबी हाऊसिंग फायनान्स लिमिटेड, एक प्रतिभूत धनको म्हणून कोणतेही कारण न देता कोणतीही वा सर्व बोली रद्द करण्याचा अधिकार राखून आहेत. बोली रद्द करण्यात आल्यास, प्राधिकृत अधिकारी हे कोणत्याही एका निविदा सादर केलेल्या वा इच्छुक बोलीदारासमवेत किंवा अन्य पक्षकारांसमवेत खाजगी कराराद्वारे मालमत्तेच्या विक्रीकरिता बोलणी करू शकतील. विक्री ही सिक्युरिटी इंटरेस्ट (एन्फोर्समेंट) रूल्स, २००२ नुसार प्रतिभूत धनको/ पीएनबी हाउसिंग फायनान्स लिमिटेडच्या लिलाव विक्री समितीच्या निश्चितीच्या अधीन असेल.

१७. इच्छुक बोलीदार/प्रस्तावदार स्वतः वा त्यांच्याद्वारे अधिकृत प्रतिनिधींव्यतिरिक्त अन्य कोणीही व्यक्तीस लिलाव/विक्री प्रक्रियेत सहभाग घेण्याची परवानगी नसेल.

१८. प्राधिकृत अधिकारी हे पूर्व सूचना न देता आपल्या अखत्यारित सदर सूचनेतील कोणत्याही अटी व शर्तीमध्ये बदल करण्याचा अधिकार राखून आहेत तसेच ते कर्जदारांकडून त्यांची व्यावसायिक शुल्कांतर्गत ताबा घेतलेल्या गहाण मालमत्तेच्या विक्रीमध्ये मार्केटिंग एजंट वा सेवा प्रदाते यांची सेवाही प्राप्त करू शकतील.

१९. लिलाव तारखेच्या एक कार्यदिवस अगोदरपर्यंत प्रतिभूत अधिकाऱ्याद्वारे झालेला सर्व मूल्य, प्रभार व खर्च रकमेसमवेत सर्व थकबाकीचे प्रदानवरील नामित कर्जदार/सहकर्जदारांद्वारे करण्यात आल्यास मालमत्तेची विक्री केली जाणार नाहीत व प्रस्तावित बोलीदारांकडून प्राप्त सर्व बोली त्यांना पीएनबी हाउसिंग फायनान्स लिमिटेडविरोधातील कोणत्याही दायित्व/दाव्यांशिवाय परत करण्यात येईल.

२०. सदर सूचना ही थकबाकीचे पूर्ण प्रदान न झाल्यास, वरील विहित तारखेस विक्री आयोजित करण्यासंदर्भातील सहाय्याबाबतीत कर्जदार/गहाणवटदार/हमीदारांना दिलेली १५ दिवसांची सूचनाही आहे.

२१. निविदा दस्तावेज पीएनबी हाउसिंग फायनान्स लिमिटेडच्या स्थानिक शाखेतून वरील विहित केल्याप्रमाणे प्राप्त करता येतील किंवा वेबपोर्टल www.auctions.magicbricks.com वरून डाऊनलोड करता येऊ शकतील. इच्छुक बोलीदारांनी त्यांचे पोर्टलवर नोंदणीकरण करवून घ्यावे व पुरेशा कालावधीच्या आत लॉग इन आयडी व पासवर्ड प्राप्त करावा जो मॅजिकब्रिक्स रियल्टी सर्व्हिसेस लिमिटेडकडून ई-बोलीकरिता अनिवार्य आहे. मॅजिकब्रिक्स रियल्टी सर्व्हिसेस लिमिटेडच्या पोर्टलवर प्रशिक्षण सुविधासुद्धा उपलब्ध आहे. विक्रीच्या विस्तृत अटी व श[illegible]करता प्रतिभूत धनकोंची वेबसाइट www.pnbhousing.com वर दिलेली लिंक पाहावी.

२२. कर्जदार/गहाणवटदारांना याद्वारे सूचित करण्यात येत आहे की, त्यांनी पीएनबी हाउसिंग फायनान्स लिमिटेडच्या ताब्यांतर्गत असलेल्या सदर गहाण मालमत्तेच्या आतील त्यांच्या मालकीच्या व्यक्तिगत वस्तु/सामान पीएनबी हाउसिंग फायनान्स लिमिटेडला पूर्वसूचना देऊन सदर प्रसिद्धी दिनांकापासून १५ दिवसांच्या आत घेऊन जावे अन्यथा पीएनबी हाउसिंग फायनान्स लिमिटेड यासंदर्भात कोणतेही दायित्व/जबाबदारी घेणार नाही व कर्जदार/गहाणवटदारांच्या जोखमीवर त्यांची वासलात लावण्यात येईल.

२३. विशेष निर्देश : अखेरच्या क्षणास बोली सादर करणे बोलीदारांनी टाळावे कारण कोणत्याही प्रकारची अडचण/खोळंबा (इंटरनेट/वीज खंडित होणे आदी) यांकरिता पीएनबी एचएफएल किंवा सेवा प्रदाते यापैकी कोणीही जबाबदार नसतील. अशा आकस्मिक परिस्थितीवर तोडगा काढण्यासाठी बोलीदारांनी आवश्यक उपाययोजना/व्यवस्था जसे पॉवर सप्लाय बॅक अप आदींची व्यवस्था करावी जेणेकरून अशा परिस्थितीवर तोडगा काढता येईल व लिलावात यशस्वीरीत्या सहभाग घेता येईल. रकाना क्र. आय मध्ये विहित केल्यानुसार लिलाव विक्रीची कालमर्यादा समाप्त झाल्यावर लिलाव विक्री आपोआप बंद होईल. प्राधिकृत अधिकारी आपल्या अखत्यारित लिलाव विक्री १५ मिनिटांनी वाढवू शकतील.

ठिकाण : पुणे
दिनांक : २२.१२.२०१८

सही/-
प्राधिकृत अधिकारी
पीएनबी हाऊसिंग फायनान्स लिमिटेड